<u>असुधारित प्रत</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **(गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —**

**सर्वश्री. संजय दत्त,** नरेंद्र पाटील, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, हेमंत टकले, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, ॲड. निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये, प्रा. अनिल सोले, श्री.नारायण राणे, डॉ. अपूर्व हिरे, श्री. चंदूभाई पटेल, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. आनंद ठाकूर, जगन्नाथ शिंदे, सतिश चव्हाण, विजय ऊर्फ भाई गिरकर, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री.अनिल भोसले, नागोराव गाणार, रविंद्र फाटक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणाऱ्या स्टेंट, कॅथेटर, बलून्ससारख्या वैद्यकीय सामुग्रीसाठी रुग्णांकडून उत्पादन किंमतीपेक्षा दहापट अधिक किंमत आकारली जात असणे, वैधमापन शास्त्र विभागाने मुंबईतील लिलावती हॉस्पिटल, बांद्रे, एशियन हार्ट इन्स्टिट्युट, मुलुंडमधील फोर्टिस हॉस्पिटल, अंधेरीतील कोकीळाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पिटल, परळ येथील ग्लोबल हॉस्पिटल, पवई येथील हिरानंदानी हॉस्पिटल, व सर एच.एन.हॉस्पिटल (रिलायन्स फॉऊंडेशन) या ८ रुग्णालयांवर टाकलेल्या छाप्यातून धक्कादायक वास्तव माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, दुप्पट एमआरपी किंमती आकारलेले स्टेंट, कॅथेटर, बलून डिव्हाइस या हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणाऱ्या सामुग्रीचा रुग्णालयांकडून तसेच उत्पादक साखळीकडून ही लूट सुरु असणे, वैधमापन शास्त्र विभागाच्या २०११ च्या नियमानुसार या उत्पादनांची विक्री, वितरण करण्यापूर्वी तसेच त्यांना कस्टम विभागाकडून आयातीसाठी परवानगी मिळवतानाही मूळ बिलावर व उत्पादनावर सारख्या किंमतीची नोंद असायला हवी, प्रत्यक्षात मात्र आयात करण्यात आलेल्या व रुग्णालयांना विकण्यात आलेल्या किंमतीमध्ये तफावत दिसून येणे, अँन्जीओप्लास्टी शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेंटची किंमत सुमारे १ ते १.५ लाख रुपये असणे, राज्यात मुंबईसह हजारोंनी अँन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात येणे, गरीब रुग्णांना १ ते १.५ लाख रुपये खर्च करणे शक्य

नसल्यामुळे केंद्र शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासूमारास स्टेंट ची किंमत ३० हजार रुपये करुन याच दराने स्टेंट विकण्याच्या सूचना वितरकांना देण्यात येणे, परंतू राज्यातील स्टेंट वितरकांनी यास दिलेला नकार, शासनाने आदेश देवून सूध्दा स्टेंट विक्रेत्यांनी ३० हजार रुपयांत स्टेंट देण्यास नकार दिल्यामुळे राज्यातील हृदयविकाराने त्रस्त असलेल्या रुग्णांत पसरलेला तीव्र असंतोष व भितीचे वातावरण, सदरील प्रकार राज्यातील इतर रुग्णालयांकडून सुरु असणे, असहाय्य रुग्णांची बेसुमार लूट थांबविण्याबाबत शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, ह्दयशस्त्रक्रियेच्या सामुग्रीच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची लूट करणाऱ्या संबंधीत रुग्णालयांवर तातडीने कारवाई करुन ह्दयशस्त्रक्रियेची साधनसामुग्री रुग्णांना रास्त भावात उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) व (३)] —**

(२) **सर्वश्री. जयंत पाटील,** धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, अॅड. निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ऊर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील साखर कारखान्यांना मूलभूत सुविधा संमती (इन्फ्रास्ट्रक्चर क्लीअरन्स) प्रलंबित असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी (एम.एस.सी.डी.सी.एल.) बरोबर वीज खरेदी करार (पॉवर परचेस् अॅग्रिमेंट) करण्यास अडचण येणे, पॉवर परचेस् अॅग्रिमेंट किमान २ हजार मेगा वॅटसाठी संमती मिळणे आवश्यक असणे, ज्या कारखान्याकडे सहवीज निर्मिती प्रकल्प आहेत त्या कारखान्यांना शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देणे सोईस्कर होणे, परंतु ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत अशा कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे ते साखर कारखाने आर्थिक संकटात सापडणे, ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत त्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पात समाविष्ट करून घेतल्यास त्यांच्यावर येणारे आर्थिक संकट दूर होऊन त्या साखर कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देणे सोईस्कर होणे, यासाठी अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांना व शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही."

(३) **श्री. नारायण राणे,** श्रीमती हुस्नबानू खलिफे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग, सावंतवाडी भागात माकडतापाचा मोठ्या

प्रमाणात प्रादुर्भाव होऊन माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये या तापाने दोघांचा झालेला मृत्यू व आतापर्यंत जिल्ह्यात ५० पेक्षा जास्त रुग्ण माकडतापाने ग्रस्त असल्याचे आढळून येणे, या तापाच्या नियंत्रणासाठी प्रशासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये व पर्यटकांमध्ये पसरलेले तीव्र भीतीचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"बोरीवली पूर्व मधील काजूपाडा टेकडी या क्षेत्रात पाण्याची समस्या निर्माण झाल्याने उदंचन केंद्र व स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत येथील रहिवाश्यांची मागणी असणे, येथील वस्ती उंचावर असल्याने पाणीपुरवठा सुरळीत होत नसून परिसरात मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होणे, उदंचन केंद्र व स्वतंत्र पाणीपुरवठा योजना या परिसरात राबविणे अत्यंत गरजेचे असणे, याबाबत नागरिकांकडून स्थानिक लोकप्रतिनिधीकडे वारंवार मागणी होणे, या परिसरातील पाण्याच्या समस्यांकडे संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत असणे, यामुळे सामान्य जनतेत शासनाविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **वित्त मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"केंद्र शासनाने कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर राज्यात नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पामध्ये सातव्या वेतन आयोगासंदर्भात कोणतीही तरतूद नसल्यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वर्षभर वेतन आयोग लागू न होण्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, राज्यातील जवळपास २० लाख शासकीय व निमशासकीय कर्मचारी व शिक्षक केंद्र शासनाच्या घोषणेनंतर गेल्या वर्षभरापासून वेतन आयोगाच्या प्रतिक्षेत असणे, त्याचप्रमाणे वेतन आयोग लागू करण्याकरिता नेमलेल्या राज्यवेतन आयोग सुधारणा समितीस अद्यापर्यंत कार्यालय देखील न मिळणे, त्यामुळे सदर समिती नेमून बराच काळ उलटूनही प्रत्यक्ष कामास सुरुवात न होणे, विविध शासकीय अधिकारी कर्मचारी संघटना यांनी मा. मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांना निवेदन देऊन वाढती महागाई व तुटपुंजे वेतन या विरोधात वेतन आयोग तात्काळ लागू करण्यासंदर्भात व पाच दिवसांचा आठवडा तसेच निवृत्त होण्याची मर्यादा ५८ वरुन ६० वर्षे आणि ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सद्य:स्थितीत ६० वर्षे निवृत्त होण्याची मर्यादा लागू आहे अशांना ६२ वर्षे पर्यंत

वाढविण्याकरिता आंदोलन करुन राज्यव्यापी संप पुकारण्याचा दिलेला इशारा, अद्याप पर्यंत सदर निवेदनाबाबत शासनाकडून कोणतीही ठोस पाऊले न उचलल्यामुळे राज्यातील शासकीय नोकरवर्गांत पसरलेला असंतोष, वेतन आयोगाबाबत शासनाची दिसून आलेली उदासीनता, परिणामी शासकीय अधिकारी व कर्मचारी महासंघाने दिलेल्या संपाच्या इशाऱ्यामुळे राज्यातील जनमानसांत पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यामुळे शासनाने या गंभीर विषयावर तात्काळ निर्णय घेऊन वेतन आयोग लागू करण्याबाबतची करावयाची घोषणा, तसेच सरकारी, निमसरकारी कार्यालय व शाळा आणि महाविद्यालये यांना पाच दिवसांचा आठवडा व निवृत्तीच्या मर्यादेबाबत घ्यावयाचा निर्णयावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे,** सर्वश्री. किरण पावसकर, धनंजय मुंडे, ॲड. निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.आनंद ठाकूर, हेमंत टकले, सुनिल तटकरे, विक्रम काळे, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री.अनिल भोसले, जगन्नाथ शिंदे, रविंद्र फाटक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे जिल्ह्यातील फुलवडे आणि मावळमधील वडेश्वर येथील मुलींच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थीनींशी असभ्य वर्तवणूक तर जुन्नर मधील कोळेवाडीतील आश्रमशाळेत मुली धोकादायक इमारतीत राहत असल्याचे जिल्हा प्रशासनाने नेमलेल्या तपासणी पथकाच्या माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास केलेल्या तपासणी अहवालात आढळून येणे, सदरचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर करण्यात येणे, राज्यभरातील अनेक आश्रमशाळांमध्ये विद्यार्थांचे शोषण होत असल्याच्या घटना वारंवार घडत असणे, तसेच आश्रमशाळांतील विद्यार्थांसाठीचे ११ कोटींचे टुथपेस्ट कंत्राट खरेदी समितीने नियम धाब्यावर बसवत परस्पर अपात्र ठरवलेल्या कंपनीला दिल्या प्रकरणी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या सुमारास लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन देण्यात येणे, याबाबत शासनाने अद्यापही चौकशी न केल्यामुळे सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"सातारा जिल्हयातील ढेबेवाडी (ता.पाटण) येथील दक्षिणवांग नदीवरील वांग मराठवाडी धरणाचे काम १९९७ साली सुरु झाले असून अद्यापर्यंत ते काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मार्च, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस

येणे, सदर धरणाची पाणी साठवण क्षमता २.७३ टी.एम.सी. असून धरणाचे काम अर्धवट असल्याने व धरणात गाळ साचल्याने सध्या फक्त ०.६० टी.एम.सी .पाणी साठा होत असणे, या धरणाच्या लाभक्षेत्रामध्ये ढेबेवाडी विभागातील उत्तरवांग नदीकाठच्या जानुगडेवाडी, शितपवाडी, मंद्रुळकोळे या गावांचा समावेश केला असुन अनुक्रमे २-१६ हेक्टर, २-६२ हेक्टर, ४-६३ हेक्टर जमिनी शासनाने संपादित केल्या असणे, मात्र भौगोलिकदृष्टया सदर गावांना या धरणाचे पाणी मिळत नसल्याने तेथील शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, तसेच मेंढ व केकतवाडी ता. पाटण या गावातील प्रकल्पग्रस्तांचे सांगली जिल्ह्यात पुनर्वसन करण्याचे शासनाचे नियोजन असणे, मात्र सातारा जिल्हयातच पुनर्वसन करावे अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी असणे, तसेच तेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व संपूर्ण पायाभूत सुविधा देण्यापूर्वीच शासनाने धरणाच्या घळभरणीचे काम हाती घेणे व घळभरणीच्या कामासाठी जिल्हाधिकारी व दंडाधिकारी यांची पूर्व परवानगी देखील घेतली नसणे, अशाप्रकारे जबाबदारी पूर्ण करण्यात शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे तेथील प्रकल्पग्रस्त व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना आणि आत्मदहन करण्याची वृत्ती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"डॉ. कस्तुरीरंगन समितीने दिलेल्या अहवालानुसार केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या अधिसुचनेन्वये पश्चिम घाटातील बहुतांश भाग संवेदनशील क्षेत्र (Eco Sensative Zone) म्हणून अधिसूचित झाल्यामुळे त्यामध्ये महाराष्ट्रातील विशेषत: रोहा, नागोठाणे तसेच इतर १३ औद्योगिक वसाहतीमधील शेकडो उद्योगधंदे धोक्यात आल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये उघडकीस येणे, या औद्योगिक वसाहतीची एकूण गुंतवणुक सुमारे २०००० कोटी रुपयांपेक्षा जास्त असून वार्षिक उत्पन्न देखील हजारो कोटीमध्ये असणे, सदर भाग अधिसुचित झाल्यामुळे जवळपास सर्वच उद्योगधंदे बंद होण्याची शक्यता, त्यामुळे हजारो कोटीपेक्षा जास्त रुपयांचे उत्पादन शुल्क बुडीत जाऊन शासनाच्या महसुलीत होणारी प्रचंड घट, लाखांपेक्षा जास्त कामगारांना रोजगार मिळत असलेल्या कंपन्यांचेच भविष्य धोक्यात आल्याने कामगारांच्या भविष्यातील रोजगारांवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, परिणामी हे सर्व उद्योगधंदे राज्याबाहेर जाण्याची निर्माण झालेली परिस्थिती, सदर अहवाल अंतिम होत असताना केरळ राज्याने औद्योगिक वसाहतीचे संरक्षण करण्याकरीता हरकती घेऊन स्पष्टपणे सदर अधिसूचनेस विरोध करणे, याधर्तीवर राज्य शासनाने केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने

विभागास याबाबत स्पष्टपणे विरोधदर्शक हरकती व सूचना देण्याची आवश्यकता, तसेच त्याचा पाठपुरावा करुन योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित असणे, रोहा व नागोठाणे इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी राज्य शासनास निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही ठोस पाऊले न उचलल्याने तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, त्यामुळे या गंभीर प्रश्नांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

(क) **तारांकित प्रश्न.**

(ख) **मंगळवार, दिनांक ७ मार्च, बुधवार, दिनांक ८ मार्च, गुरुवार, दिनांक ९ मार्च, शुक्रवार, दिनांक १० मार्च, मंगळवार, दिनांक १४ मार्च, सोमवार, दिनांक २० मार्च, मंगळवार, दिनांक २१ मार्च, गुरुवार, दिनांक २३ मार्च, व शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(ग) **अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

(१) **उद्योग मंत्री** : "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा व तेरावा अहवाल सादर करणे."**

**चार : "अनुसूचित जाती कल्याण समितीचा सातवा अहवाल सादर करणे."**

**पाच : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."**

**सहा : विधानपरिषद सभागृहाच्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याबाबतचा म.वि.प. नियम १७८ (१) अन्वये प्रस्ताव :-**

"सार्वजनिक उपक्रम/महामंडळांनी त्यांच्याकडील रक्कम बँकेत डिपॉझिट करावयाची किंवा शासनाच्या कोषागारामध्ये जमा करावयाची याबाबत परिनिरीक्षण करुन सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी घटित करण्यात आलेल्या विधानपरिषद

सभागृहाच्या तदर्थ समितीचा अहवाल" सभागृहास सादर करण्याची मुदत आगामी (पावसाळी) अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत वाढवून देण्यात यावी.

**सात : विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवणे.**

**श्री.संजय दत्त, वि.प.स.** : **"कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद होण्याबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

**आठ : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — (असल्यास).**

**नऊ : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**दहा : शासकीय विधेयके -**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१६ चे वि.स.वि.क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि.क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयंत पाटील, बाळाराम पाटील, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) ग्रामविकास मंत्री | (२) श्री.जयंत पाटील, वि.प.स. |
| (३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, | (४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स. |

विधानपरिषद

(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स. (६) श्री.संजय दत्त, वि.प.स.

(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(९) ॲड.अनिल परब, वि.प.स. (१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.

---

**(५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयंत पाटील, बाळाराम पाटील, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री (२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

(३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद (४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.

(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स. (६) श्री.संजय दत्त, वि.प.स.

(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(९) ॲड.अनिल परब, वि.प.स. (१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.

---

**(६) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) महसूल मंत्री
(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(७) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री
(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(८) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - डॉ.विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६"**

---

**(९) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ – महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ — महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) वैद्यकीय शिक्षण मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(१०) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(११) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ — शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे,**

**वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ – शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(१२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) सहकार मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(१३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १५ – सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १५ – सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

(१४) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**अकरा : (क) (बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**श्री.सुजितसिंह ठाकूर,** डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.तानाजी सावंत, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -**

"राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य सरकारने लिफ (LIIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्डकडून रक्कम रुपये १२,७७३ कोटी रुपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले

प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर भरती करणे व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील ५ वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतिक्षा यादी १ ते २ वर्षांवर येणे, प्रतिक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने वीजपुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्याने रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पीक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला सहभाग, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीजपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य सुजलाम्-सुफलाम् होण्याच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टीने शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख)** **डॉ.सुधीर तांबे,** सर्वश्री.धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण, आर्कि. अनंतराव गाडगीळ, सर्वश्री.किरण पावसकर, सुभाष झांबड, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, रामहरी रुपनवर, नरेंद्र पाटील, अमरनाथ राजूरकर, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, अनिल तटकरे, मोहनराव कदम, रामराव वडकुते, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"राज्य शासनाने मोठा गाजावाजा करुन मेक ईन इंडिया व मेक इन महाराष्ट्राची घोषणा केलेली असली तरीही सद्य:स्थितीत राज्यात उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आलेली मंदी, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, जळगांव, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर इत्यादी जिल्ह्यासह सर्व औद्योगिक शहरातील बंद पडलेले उद्योग, उद्योग विभागाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पूर्वी आर्थिक फायदे घेतलेले असणे, परंतु आज त्या जागेवर वर्षानुवर्षे बंद असलेले उद्योग, या हजारो बंद उद्योगांकडे राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांचे कोट्यावधी रुपयांचे थकीत असलेले कर्ज, कर्ज देणाऱ्या बँकांना अशा बंद उद्योगांच्या प्लॉटवर शासनाच्या

नियमामुळे कारवाई करणे शक्य नसल्यामुळे नवीन उद्योगासाठी प्लॉट उपलब्ध करता न येणे, त्यामुळे उद्योगधंद्यांची वाढ थांबणे, परिणामी अनेक उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होणे, नवीन उद्योग निर्माण न झाल्यामुळे ओढवलेली बेरोजगारी, सेस खाली २ हजार एक जमीन घेण्यात येणे, परंतु त्यावर उद्योग निर्मिती करण्यास शासनाची असलेली उदासिनता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने जमीन मंजूर केल्यानंतर उद्योग घटकास देकार पत्र देण्यास अवाजवी कालावधी लागणे, त्यामुळे शासकीय धोरणाबद्दल संभ्रम व निराशेचे वातावरण पसरणे, गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी संपर्क साधून सर्व मंजूऱ्या मिळवून देण्यासाठी मैत्री कक्ष स्थापन करणे, सदर कक्षांकडून कोणतेही सकारात्मक काम न होणे, फक्त आलेल्या तक्रारीचे निरसन करण्यात येत असणे, त्यामुळे मैत्री कक्ष स्थापनेमागील हेतू निष्फळ ठरणे, विविध परवानग्यासाठी उद्योजकांचा छळ होणे, अशा परवानग्या घेत असताना मोठ्या प्रमाणात लाचखोरी होत असल्याचे उघड होणे, उद्योगासाठी वीजेच्या दरात सवलतीमध्ये वेगवेगळ्या विभागामध्ये दुजाभाव करण्यात येणे, तसेच साततत्याने वाढणारे विजेचे दर उद्योग क्षेत्रातील मंदीमुळे व नोटाबंदीमुळे अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांवर परिणाम झाल्यामुळे त्यात काम करणाऱ्या कामगारांची रोजंदारी कमी केली जात असणे, किंवा त्यांना कामांवरुन कमी केले जात असल्याने या कामगारांवर बेरोजगारीमुळे आलेली उपासमारीची पाळी, कामगार कायद्यातील त्रुटींमुळे कंत्राटी कामगारांचा प्रश्नही अनेक वर्षे प्रलंबित असणे, शासनाच्या उद्योग क्षेत्राच्या उदासिन धोरणामुळे राज्यात बिकट परिस्थिती निर्माण झाली असून अनेक उद्योग राज्यांबाहेर जात असताना याकडे राज्यशासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — [अनुक्रमांक — (ग) ते (ङ)] —**

**(ग)** **सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, जनार्दन चांदुरकर, जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, अनिल तटकरे, आनंदराव पाटील, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये**

**प्रस्ताव** -

"केंद्र शासनाच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे शेतीमालाच्या दरात मोठी घसरण होणे, मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी उत्पादित मालाला बाजारपेठेत भाव नसणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, राज्यात मागील तीन वर्षात ९ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, सन २०१६ या एकाच वर्षात सुमारे तीन हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात केवळ मराठवाड्यात ११७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व नापिकीला कंटाळून आत्महत्या करणे, सततच्या दुष्काळ आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असणे, दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना होत नसणे, मागील वर्षी डाळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शासनाने डाळ वर्गीय पिकांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले, यावर्षी तूरीचे विक्रमी उत्पादन होणे, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बाजारपेठेतील तूरीचे भाव मोठ्या प्रमाणावर कोसळणे, शासनाने आधारभूत किंमतीने तूर खरेदी करण्याचा निर्णय घेणे, मात्र तूर खरेदीबाबत कोणतेही नियोजन नसल्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागणे, राज्यात लाखो क्विंटल तूर खरेदी केंद्रावर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकरी आठ ते दहा दिवस रांगेत तूर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीची वाट पाहण्याची वेळ येणे, कर्मचारी आणि व्यापारी यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांना कमी भावाने स्थानिक व्यापाऱ्यांना तूर विक्री करण्याची वेळ येणे, कांदा, हरभरा, कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरीसुध्दा मोठ्या प्रमाणावर अडचणीत असणे, शासनाने शेती मालाचे भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनविरोधी संतापाची भावना असणे, शेजारील कर्नाटक सारख्या राज्याने शेतीमालाला बोनस देण्याचे धोरण स्वीकारणे, मात्र महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात शेतीमालाला बोनस देण्याचे कोणतेही धोरण नसणे, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असणे, उत्तर प्रदेशात सत्तेवर आल्यास कर्जमाफी करु अशी घोषणा करण्यात येणे, मात्र याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बिनव्याजी कर्ज देण्यासाठी कोणतीही उपाययोजना होत नसणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करुन बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(घ) **सर्वश्री शरद रणपिसे,** धनंजय मुंडे, नारायण राणे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरसिंह पंडित, जनार्दन चांदूरकर, सतीश चव्हाण, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री.किरण पावसकर, सुभाष झांबड, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, रामहरी रुपनवर, नरेंद्र पाटील, अमरनाथ राजूरकर, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, अनिल तटकरे, मोहनराव कदम, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण, शहरीकरण वाढत असताना त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपालिका यांच्यावर पडत असलेला ताण, नविन शहरीकरण होत असल्यामुळे त्याठिकाणी रस्ते, सांडपाणी, घनकचरा व पाणीपुरवठा करणेबाबत स्थानिक स्वराज्य संस्था असमर्थ असणे, शहरीकरण वाढत असले तरी महानगरपालिकांना राज्य शासन पुरेसा निधी देत नसणे, त्यातच एलबीटी रद्द केल्यामुळे महानगरपालिका व राज्य शासन आर्थिक अडचणीत असणे, यापूर्वी केंद्रातील युपीए शासनाने शहरी विकासासाठी अनेक आणलेल्या योजना राज्यशासनाने बंद करणे, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरोत्थान योजना बंद करुन स्मार्ट सिटी योजना आणणे, परंतु त्यासाठी निधींची भरीव तरतूद नसणे, तसेच अद्यापही स्मार्ट सिटीबाबतचे प्रकल्प अहवाल तयार नसणे, नागरी क्षेत्रात पाणी टंचाईची समस्या दिवसेंदिवस उग्ररुप धारण करीत असणे, मुंबईतील ४ लाख झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत स्वत:च्या मालकीची घरे देण्याची घोषणा शासनाने करणे, परंतु अद्यापही याबाबत झोपडपट्टीधारकांना घरे उपलब्ध करुन न देणे, मुंबईतील एसआरए योजनेखाली बांधलेल्या ३५ हजार सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र न मिळणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा केवळ वाढीव चटई क्षेत्र मिळविण्यासाठी विकासक या योजनेचा वापर करुन घेत असणे, ठाणे, जिल्ह्यातील ७ महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई, नागपूर शहरातील सिव्हील लाईनचा परिसर वगळता अन्य भागात असलेले खराब रस्ते व पायाभूत सुविधांचा अभाव, पुणे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी, पार्कींगची समस्या, मेट्रो सुरू करण्याची केलेली घोषणा, काही प्रमुख भागात जनतेच्या मागणीनुसार रस्ता रुंदी रद्द न करणे, जुन्या वाड्यांचा पुनर्विकासाचा प्रलंबित असलेला प्रश्न, राज्य शासनाने पुणे शहरातील

मेट्रोलगत जाहिर केलेल्या वाढीव चटई क्षेत्राचे होणारे दुरगामी दुष्परिणाम, डंम्पिग ग्राऊंड व कचऱ्याची समस्या, औरंगाबाद शहरासाठी करावयाची समान्तर जलवाहिनी योजना कार्यान्वित न होणे, नारेगाव कचरा डेपोचा प्रलंबित प्रश्न, औरंगाबाद शहरातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था व महापालिकेत नव्याने समाविष्ठ केलेल्या गावांचा निधीअभावी विकास न होणे, राज्यातील पर्यटन क्षेत्रात साईन बोर्ड नसल्यामुळे पर्यटकांना होणारा त्रास, एकूणच राज्यातील नागरी क्षेत्रात सर्वच पायाभूत सुविधांचा अभाव असताना राज्य शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शहराच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद करण्यास होत असलेली दिरंगाई, त्यामुळे नागरीभागात विकासाचा उडालेला बोजवारा, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ङ) **सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री.जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, आनंदराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"सर्वसामान्यांना मुंबईत म्हाडाच्या माध्यमातून घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाच्या बदल्यात विकासकाने म्हाडाला अधिमुल्याऐवजी गृहसाठा द्यावा अशी दुरुस्ती करण्यात आलेली असणे, परंतु शासनाच्या नविन गृहनिर्माण धोरणात विकासकाकडून गृहसाठ्याऐवजी पैसे घेण्याची तरतूद करण्यात येणे, शासकीय जमिनीवरील झोपड्यांना एस.आर.ए. अंतर्गत भाडेपट्टा उपलब्ध करुन जागा मालकी तत्वावर देणे, संक्रमण शिबिरात अनधिकृत घुसखोरी केलेल्या घुसखोरांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना रेडी रेकनर दरानुसार किंवा पंतप्रधान आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्यात येणे, एफ.एस.आय.ची खैरात वाटून पायाभूत सुविधेवरील ताण वाढणे, विकासकाकडून विनामुल्य प्राप्त होणाऱ्या पाच हजार सदनिका अद्याप म्हाडाला प्राप्त झालेल्या नसणे, शासनाचे गृहनिर्माण धोरण बिल्डरांच्या सभेत विभागाला थांगपत्ता लागू न देता जाहीर करण्यात येणे, स्थावर मालमत्ता कायद्याच्या अंमलबजावणी करीता होत असलेला विलंब, तसेच राज्यातील निवासी डॉक्टरांवर सातत्याने हल्ले होणे, त्यात डॉक्टरांना गंभीर इजा पोहचणे, वाढत्या हल्ल्यांमुळे डॉक्टरांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, सुरक्षेच्या मागण्यांसाठी राज्यातील निवासी डॉक्टरांनी रजा आंदोलनाच्या माध्यमातून संप

सुरू करणे, संपामुळे राज्यातील रुग्णसेवा ठप्प होणे, उपचाराअभावी रुग्णांचे अतोनात हाल होणे, गंभीर आजारी रुग्णांना प्राण गमवावे लागणे, मा. उच्च न्यायालयानेही संपाची गंभीर दखल घेऊन रुजू न होणाऱ्या डॉक्टरांना बडतर्फ करण्याचा इशारा देणे, मा.न्यायालयाच्या कारवाईच्या इशाऱ्यानंतर "मार्ड" ने संपापासून स्वत:ला वेगळे करणे, न्यायालयाच्या आदेशानंतर, तसेच प्रशासनाने नोटीस बजावूनही डॉक्टर रुजू न होणे, यामुळे राज्यातील रुग्णांच्या जिविताला धोका निर्माण होणे, निवासी डॉक्टरांच्या संपावर तातडीने तोडगा काढून कायमस्वरुपी, परिणामकारक तोडगा शोधणे आवश्यक असणे, तसेच म्हैसाळ (जि.सांगली) येथेही डॉ.खिद्रापुरे यांच्या क्लिनिकमध्ये अनेक गर्भपात केलेले असणे, गर्भलिंग निदान करुन स्त्री-भ्रूणाची हत्या करणे, गर्भपातासाठी मिसोप्राससारख्या गोळ्या वापरलेल्या असणे, ही औषधे मुंबईतून अवैधरित्या दलालाकडून खरेदी केलेली असणे, या गर्भपाताच्या रॅकेटमध्ये अनेकजणांचा सहभाग असल्याचे उघडकीस येणे, याप्रकरणी जलदगतीने तपास करणे आवश्यक असणे, या सर्व गोष्टींचा विचार करता राज्यातील डॉक्टरांना संरक्षणाबरोबरच रुग्णांनाही रुग्णसेवा देणे गरजेचे असणे, स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी कठोर निर्णय घेणे आवश्यक असणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील झोपडी धारकांना दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**बारा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मौजे पाचल (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथील दिवाळवाडी धरण व कालवा यांची दुरुस्ती कामे विस्तार व सुधारणा लेखाशिर्षाअंतर्गत करण्याबाबतचे अंदाजपत्रक शासनाकडे पाठवून मान्यता न मिळणे, अंदाजपत्रकास मान्यता न मिळाल्याने धरण व कालवा दुरुस्तीचे काम २ ते ३ वर्षापासून प्रलंबित राहणे, सदर काम प्रलंबित राहिल्याने धरणाच्या कालव्यावर अनेक ठिकाणी अनधिकृतपणे बांधकामे झालेली असणे, अनधिकृत बांधकामे निष्काषित करुन कालव्याचे दुरुस्तीचे काम करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.नागोराव गाणार, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील शासकीय व खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा व रजा प्रवास सवलतीचा लाभ देण्याबाबत दिनांक

१२ मे, १९८९ रोजी शालेय शिक्षण विभागातर्फे शासन निर्णय निर्गमित करणे, सदर शासन निर्णय राज्यातील नगर परिषदांच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्याप लागू करण्यात न येणे, नगर परिषदेचे शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करणे, रिट पिटीशनवर दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२ मे, १९८९ रोजीच्या शासन निर्णयाचा लाभ नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांना देण्याचे आदेश शासनास देणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २९ मार्च, २०१७.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**